


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७८ वा ❑ शनिवार दि.०३ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## महापालिकेची निवडणुक मतदारांना संभ्रमात टाकणारी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीतील तीनही पक्ष एकमेकांच्या विरोधात लढत आहे. कुठे युती, तर कुठे स्वतंत्र, तर कुठे परस्परविरुद्ध महानगरपालिकेच्या निवडणुका लढत आहे. भाजप शिंदे अजित दादा युती, शरद पवार अजितदादा युती, शरद पवार काँग्रेस उद्धव ठाकरे युती, उद्धव ठाकरे राज ठाकरे युती मग विरोधक कोण?हा प्रश्न आता मतदारांना पडला आहे.

भाजप आणि काँग्रेस वगळता, या निवडणुकीत सर्वजण सर्वांसोबत आहेत आणि सर्वजण सर्वांविरुद्ध आहेत. जे सोबत आहेत ते विरोधात आहेत. जे विरोधात आहेत ते एकमेकांसोबत आहेत. काही ठिकाणी ते एकमेकांसोबत आहेत तर काही ठिकाणी ते एकमेकांच्या विरोधात आहेत.निवडणुकीतील राजकारणाच्या या विचाक्यामुळे मतदार मात्र संभ्रमात आहे.

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत उदयास आलेल्या नवीन राजकीय समीकरणामुळे राजकीय पंडितांनाच गोंधळात टाकले नाही तर प्रमुख राजकीय पक्षांनाही हे समीकरण समजणे कठीण झाले आहे. महाराष्ट्राचे नवीन राजकीय समीकरण काय आहे? कोणता पक्ष कोणासोबत निवडणूक लढवत आहे, कोण कोणाविरुद्ध आहे, कोण कोणासोबत आहे आणि कोण कोणाच्या विरोधात आहे? हे मात्र कळेनासे झाले आहे.

भाजप-शिंदेसेना बहुतेक ठिकाणी एकत्र लढणार असे कालपर्यंतचे चित्र असतानाच अनेक ठिकाणी या युतीला मंगळवारी तडे गेले. काँग्रेसची वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळ्या पक्षांशी आघाडी झाल्याचे दिसत असून अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये हातमिळवणी केली आहे.

नागपुरात स्वबळावर लढत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अकोल्यात भाजपशी युती केली आहे. महापालिकागणिक मित्र आणि विरोधकांची इतकी अभूतपूर्व अदलाबदल यापूर्वी कोणत्याही महापालिका निवडणुकीत झालेली नव्हती. मुंबई, ठाणे, नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकमेकांच्या हातात हात घालून मते मागताना दिसतील तर बहुतेक महापालिकांमध्ये एकमेकांवर त्यांना टीका करावी लागणार आहे. मुंबईत उद्धव सेनेच्या विरोधात लढत असलेल्या काँग्रेसने पुण्यात त्यांच्याशी आघाडी केली आहे.

राज्यातील राजकीय पक्षांनी सोयीचे राजकारण करताना सर्वच तत्त्वे धाब्यावर बसवली आहेत. ज्या नेत्यावर दुपारच्या सभेत एखादा नेता कडाडून टीका करतो, त्याच नेत्याचे गुणगान त्याला दुसऱ्या शहरात संध्याकाळी करावे लागत आहे. एका महापालिकेत जो पक्ष मित्र आहे, तोच शेजारच्या महापालिकेत कट्टर शत्रू बनला आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम असून मतदारांनी कुणाला मतदान करायचे.असा प्रश्न आता मतदारांना पडला आहे.

राज्याच्या राजकारणाचा जो विचका झाला त्याला कारण ठरले आहे.महाराष्ट्रातील राजकारण व युती सरकार.तिन्ही पक्षाची विचारधारा वेगवेगळी असून केवळ सत्तेसाठी एकत्र येऊन युती करत सरकार स्थापन केले.

गेल्या ८ वर्षांत बरेच काही बदलले आहे. आता, एका शिवसेनेत दोन शिवसेना आहेत. आता, एका राष्ट्रवादीत दोन राष्ट्रवादी आहेत. आता, एक शिवसेना भाजपसोबत आहे आणि दुसरी भाजपच्या विरोधात आहे. आता, एक राष्ट्रवादी भाजपसोबत आहे आणि दुसरी त्याच्या विरोधात आहे. पण ही सर्व विधानसभा निवडणुकीची समीकरणे आहेत. राज्यस्तरीय राजकारणाची समीकरणे पुन्हा सांगूया. पहिली युती म्हणजे महायुती, ज्यामध्ये भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्र आहेत. दुसरी युती म्हणजे महाविकास आघाडी, ज्यामध्ये काँग्रेस, उद्धव यांची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र आहेत. उर्वरित युती म्हणजे मनसे, बहुजन विकास आघाडी आणि इतर लहान पक्ष. पण महानगरपालिका निवडणुकीत ही समीकरणे कोसळली आहेत आणि आता काही नवीन समीकरणे उदयास आली आहेत, ज्याची कल्पनाही कोणी केली नसेल. बीएमसी मध्ये, भाजप शिंदेंच्या शिवसेनेविरुद्ध निवडणूक लढवत आहे. भाजप २२७ पैकी १३७ जागांवर निवडणूक लढवते, तर शिंदेंची शिवसेना ९० जागांवर निवडणूक लढवते. दरम्यान, काँग्रेसने मागील सर्व युती तोडून प्रकाश आंबेडकरांच्या बहुजन वंचित आघाडीसोबत नवीन युती केली आहे. काँग्रेस आता २२७ पैकी १६५ जागांवर निवडणूक लढवत आहे, तर बहुजन वंचित आघाडी ६२ जागांवर निवडणूक लढवत आहे. आणखी एक युती ठाकरे बंधूंमध्ये आहे. महाविकास आघाडी सोडल्यानंतर, उद्धव ठाकरे यांनी त्यांचे भाऊ राज ठाकरे यांच्याशी युती केली आहे. आता, उद्धव यांची शिवसेना १७५ जागांवर निवडणूक लढवत आहे, तर त्यांचे भाऊ राज ठाकरे यांचा पक्ष, मनसे ५२ जागांवर निवडणूक लढवत आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस बीएमसीमध्ये फक्त ११ जागांवर निवडणूक लढवत आहे. तथापि, उद्धव यांनी असेही ठरवले आहे की जिथे शरद पवारांचे उमेदवार आहेत तिथे ते उमेदवार उभे करणार नाहीत. पण प्रकरण तिथेच संपत नाही. निवडणूक लढवणारा आणखी एक पक्ष आहे. अजित पवार एकटे निवडणूक लढवत आहेत. त्यांनी बीएमसीमध्ये ६४ जागांवर आपला दावा मांडला आहे. पण प्रकरण अजून संपलेले नाही. स्वतंत्रपणे निवडणूक लढवणारे आणखी दोन पक्ष आहेत. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने ३९ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. ते केंद्रात भाजपचे मित्रपक्ष आहे. राहुल गांधींचा जवळचा मित्र आणि लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा प्रमुख मित्रपक्ष असलेला अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्षही बीएमसी निवडणुका स्वतःहून लढवत आहे. समाजवादी पक्षाने १५० हून अधिक जागांवर आपला दावा मांडला आहे. राज्यात महापालिका निवडणुकीत भेसळ झाल्याचं पाहायला मिळतंय. विधानसभा निवडणुकीनिमित्त एकत्र आलेले पक्ष महापालिकांच्या निवडणुकीकरता विभक्त झाल्याचं चित्र आहे. कोणत्या शहरांत कोण कोणाबरोबर आहे, याचा काहीच ताळमेळ लागत नसल्याने राज्यभरातील जनता बुचकळ्यात पडली आहे.आता खरी परीक्षा मतदारांची आहे.

# मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ९९ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे साताऱ्यात उद्घाटन

## तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असो त्याचा दांडा मराठीच असायला हवा – अध्यक्ष विश्वास पाटील






ज्योतिर्मय साहित्य

सातारा – राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मराठी भाषेची सक्ती असेल; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. इतर भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि 'शब्देचि रत्ने' ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.



छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र, केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'जेएनयू'सारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, साहित्य निर्मिती ही समाजाच्या जाणिवा विस्तारण्यासाठी असते. त्यामुळे टीका आणि गौरव या दोन्हींतून सुधारण्याचा मार्ग शोधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजवर झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमीपुत्र होते.

संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळा फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेताना कवी नामदेव ढसाळ, मल्लिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्य व नाटकांचा गौरव केला.

९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास उद्धृत करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान आणि आपल्याला लिहते करणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असो त्याचा दांडा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे तिचा गोंडा मराठीच असायला हवा, असे सांगतानाच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील सर्व एसटी बसस्थानके आणि रेल्वेस्थानक येथे वृत्तपत्रविक्रेते आणि पुस्तक विक्रेत्यांना पुन्हा दुकाने द्यावीत. तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर माफक दरात पुस्तक विक्रीच्या दुकानांना परवानगी द्यावी, अशा सूचना त्यांनी मांडल्या.

डॉ. तारा भवाळकर यांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव कथन करताना, मराठी भाषा अधिक व्यापक होत असल्याचे सांगितले. गावखेड्यातील मुले मराठीत लेखन करत असून, गावोगावी साहित्य संमेलनांचे आयोजन होत असल्याचे चित्र आश्वासक आहे. ग्रामीण भागातही नवीन लेखक, प्रकाशक तयार होत आहेत. त्यांना प्रोत्साहन दिल्यास मराठीचा खऱ्या अर्थाने विकास होईल. प्रत्येकालाच आपल्या भावना अभिव्यक्त होता येत नाहीत. त्या व्यक्त करत मी फक्त समूह मनाचा आवाज झाले, असेही त्या म्हणाल्या.


स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंह भोसले यांनी साहित्य संमेलनामागील भूमिका स्पष्ट करताना, शतकपूर्व साहित्य संमेलन साताऱ्यात होत असल्याचा आनंद व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होत असलेले हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मराठी साहित्य चळवळीचा आढावा घेत कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी साहित्य महामंडळ ठामपणे उभे असल्याचे सांगितले.

संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोदी कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संमेलनाची सविस्तर माहिती दिली. साहित्य महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

A UNIQUE FRAME...






# जात्यावरच्या ओव्या......

माय रुक्मिणी
बाप पांडुरंग
दोहोंच्या संगतीन
झाला संसार अभंग ||४२९||

नाम घेता देवा
करतो नित्य कर्म
कष्टाचंच खातो
नाही देहाला आराम ||४३०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# स्वप्न नवे पाहू...





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

पण तुलना दुसऱ्याशी करायची नाही. ती करायची ती आपल्या स्वतःशीच ! ताडून पाहायचं स्वतःला, जोखून पाहायचं स्वतःला आणि ठरवायचं मनाशी की खरोखरच भूतकाळापेक्षा वर्तमानातला मी अधिक समृद्ध झालो आहे का ? भावनांनी, विचारांनी...? केवळ पैशांनी नव्हे. नसेल तर मला त्यासाठी आणखी काय करायला हवं ? माझं कुठे चुकत आहे का ? हीच ती वेळ आत्मपरीक्षणाची ! म्हणून तर जरा विसावू या वळणावर...!

जीवनाची गती खूप वाढली आहे. त्याबरोबर आपण वेगाने फरफटत जात आहोत. आपल्याला स्वतःसाठी देखील वेळ नाही. कुटुंबासाठी वेळ नाही. आयुष्याचा आनंद घ्यायचाच आपण विसरून जातो आहोत. जीवनातील छोट्या छोट्या आनंदाच्या क्षणांना पारखे होत आहोत. खरोखर इतकी ऊर फुटेस्तोवर धावपळ करण्याची गरज आहे का याचाही विचार करूया आणि क्षणभर थांबूया.




काल मी स्वप्नं पाहिली होती पण ती पूर्ण नाही झालीत. काही हरकत नाही पण प्रयत्न तर केलेत ना त्यासाठी ! म्हणून निराश व्हायचं नाही, घेतला वसा टाकायचा नाही. पुन्हा मोठी स्वप्नं बघायचीआणि त्यासाठी त्या वाटेवर चालत राहायचं, अविरत...! तुझको चलना होगा...

मला शेतकऱ्याचे उदाहरण फार आवडतं. शेतकरी कधी हताश,निराश होत नाही. यावर्षी निसर्गाने दगा दिला तरी पुढचं वर्ष नक्कीच चांगलं असेल ही त्याच्या मनामध्ये तीव्र आशा असते. तो उद्याची स्वप्न पाहणं थांबवत नाही. भविष्यात पीक चांगलं यावं म्हणून आज तो जमिनीची मशागत करतो, पेरणी करतो, पिकाची काळजी घेतो नको असलेले तण तणकूर काढून टाकतो. आपल्यालाही तसेच करायला हवं ना ! तरच उद्याचं उज्वल भविष्याचं पीक हाती येईल. त्यासाठी वर्तमान आपल्या हातात आहे.

नव्या वर्षाचे स्वागत करताना काही ओळी सुचतात...

स्वप्न नवे पाहू गड्यांनो
स्वप्न नवे पाहू...
स्वागत करू या नववर्षाचे
पसरूनिया बाहू.
संकल्प नवे, स्वप्न नवे
प्रयत्नांचे पर्व नवे
स्वतःला अजमावून पाहू
गड्यांनो स्वप्न नवे पाहू.
भूतकाळ तो विशाल दुर्धर
आठवणींनी करतो जर्जर
ओझे त्याचे मनावरचे
फेकुनिया देऊ,
गड्यांनो, स्वप्न नवे पाहू.
जातीपंथ ते विसरुन सारे
मानवतेचे देऊ नारे
बंधुभावाची हाक चला देऊ
गड्यांनो स्वप्न नवे पाहू. ***



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# ब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

मित्रांनो,

ब्रम्ह कधीही न ढळणारे व कधीही अंत नसणारे आहे. ब्रम्हाचा कधीही शेवट होत नाही. त्याच्या बद्दल कधीही कल्पना करता येत नाही. तो कल्पना रहित आहे. ब्रम्ह द्रुष्याच्या पेक्षा वेगळे आहे. ते साध्या डोळ्याने पाहू म्हटले तर ते दिसत नाही. ब्रम्ह दिसते तसे नाही. द्रुष्य लय पावल्यावर शुन्य उरते.ब्रम्ह तर अतींद्रिय असल्याने सर्व इंद्रियांना मिळून ते जगण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना न कळणार असे आहे.साधूसंताच्या मार्गदर्शना वाचून ब्रम्ह आपल्याला कळत नाही.

ब्रम्ह सगळ्या पेक्षा वेगळे आहे. त्याच्या पेक्षा श्रेष्ठ दुसरे काही नाही. ते एवढे सुक्ष्म आहे की साध्या डोळ्यानी ते दिसत नाही.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ.


मित्रांनो आपण अभ्यासले की ब्रम्ह ही स्थिर स्थिती आहे. आता पुढच्या ओव्यात समर्थ आपल्याला एक श्लोक सांगतात तो असा आहे.

''यतो वाचो निवर्तते अप्राप्य मनसा सह''।।

याचा अर्थ असा आहे की आपले वाणी(बोलण)व मन हे अप्राप्य आहे। असे म्हणून तेथून ते माघार घेतात. ब्रम्हापाशी वाणी माघार घेते. मनाला ब्रम्हप्राप्ति होत नाही असे श्रुतीचे सिध्दांत वचन आहे. प्रत्येक ओळ खुपच विचार करायला लावणारी आहे कसे ते पहा शांत मन केंद्रित करून एका.सारख्या कल्पना करत रहाणे हे मनाचे स्वरूप आहे. पण ब्रम्हामध्ये कल्पनेला स्थान नाही. आता एक ऊदा देते ,माझ्या हातात थंडगार पाणी आहे माझे मन मान्य करते की पाणी थंडगार आहे म्हणजे मन आपल्या कल्पनेने त्या माहितीत भर घालते. मग आपल्याला त्या पदार्थांचे ज्ञान होते. अशाप्रकारे मन जागे आहे तोपर्यंत कल्पना करत असते. मन ''कल्पनारूप आहे''असे वेदांतात म्हणतात. जागेपण काय व स्वप्न काय दोन्ही जीवाच्या सीमित अवस्था असतात. त्याच्या मध्ये पडणाऱ्या जीवाच्या ऊपयोगी असणाऱ्या कल्पना, स्मृती, विचार, लक्ष,इच्छाशक्ति,भावना यासर्व स्वस्वरूपाच्यारूपात कमी पडतात. मी पण कमी झाले की जीवपण द्वैतमय होते. आणि ते नाहिसे करण्यासाठी ''सदगुरूंच्या''चरणीं असणे आवश्यक असते.

(क्रमशः)

# प्रारब्ध म्हणजे न समजणाऱ्या गोष्टींचे कारण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपले ध्येय काय असावे हे ठरविण्याची बुद्धी माणसाला आहे, ती खालच्या प्राण्यांना नाही. हाच माणसांत आणि त्या प्राण्यांत फरक आहे. प्राण्यांना प्रारब्धाने आलेले भोग भोगावे लागतात, त्याचप्रमाणे माणसालादेखील आलेले भोग भोगावे लागतात. पण भगवंताचा पाठिंबा ज्याला आहे तो मागेपुढे सोयीने भोग भोगू शकतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्याही सर्व गोष्टी प्रारब्धाने चालतात. आपण जे मिळविले आहे ते स्वतःच्या प्रयत्नाने मिळाले, ही कल्पना गेल्याशिवाय देह प्रारब्धावर टाकता येणार नाही. ' माझे सर्व हे त्याच्या कृतीचे फळ आहे, ' असे म्हटले की क्रिया तर चालते, पण कर्तेपण राहात नाही. पुष्कळ गोष्टी अशा आहेत की, त्यांच्याकडे बोट दाखवून त्यांचे कारण अमुक, असे आपण सांगू शकतो. पण काही गोष्टी अशा आहेत की, त्यांचे कारण आपल्याला दाखविता येत नाही. अशा वेळी, त्या प्रारब्धाने घडल्या असे आपण म्हणतो. प्रारब्ध म्हणजे न समजणाऱ्या गोष्टींचे कारण होय, असे म्हणायला हरकत नाही. संतांनादेखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदुःख त्यांना नाही. व्यवहारदृष्ट्या औषध घेऊन मग भोग भोगणे हाच खरा मार्ग आहे. बुवाने आपल्या सिद्धीने रोग बरा करणे किंवा टाळणे हे बरे नाही. त्यामध्ये बुवाची प्रसिद्धी होईल खरी, पण त्यात त्याचे स्वतःचे कल्याण नाही, तसेच लोकांचेही पण हित नाही. समजा, एक मनुष्य रस्त्याने चालला असताना वाटेत एक दहा रुपयांची नोट पडलेली आढळली. पूर्वसंस्काराप्रमाणे ती उचलून घेण्याची वासना त्याला होईल, पण ती प्रत्यक्ष उचलून घ्यावी किंवा न घ्यावी हे ठरविण्याचे स्वातंत्र्य त्याला आहे. म्हणून प्रारब्धाने देहभोग आला असता त्यामध्ये मनाची वृत्ती कशी ठेवावी हे स्वातंत्र्य आपल्याला आहे. ते प्रारब्धावर अवलंबून नाही. भगवंत सगुणात आला की त्यालादेखील प्रारब्धाचा नियम लागू झाला.

आपला जन्मजात स्वभाव जरी वाईट असला तरी अभ्यासाने तो खात्रीने सुधारता येईल. जोपर्यंत आपल्या अंतःकरणात अवगुण आहेत तोपर्यंत आपली प्रगती होणे फार कठीण आहे. शेत पेरण्यासाठी ज्याप्रमाणे जमिनीची मशागत करायला पाहिजे, त्याप्रमाणे भगवंताचे प्रेम येण्यासाठी आपले अंतःकरण दुर्गुणांपासून स्वच्छ केले पाहिजे. एकदा असे अंतःकरण शुद्ध झाले म्हणजे भगवंतावाचून दुसरा कोणी नाही ही भावना टिकविणे, म्हणजेच अनुसंधान ठेवणे, फारसे जड जात नाही. अनुसंधान हे आपले ध्येय ठरवून, त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी कराव्या. त्याकरिता सर्वांनी मनापासून नाम घ्यावे, आणि आनंदात राहावे.

मिळणे आणि जाणे दोन्ही प्रारब्धाधीनच आहे. मग हर्ष, शोक वृथा का करावा ?

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## अविद्या

ज्योतिर्मय साहित्य

३ विक्षेप:- (चुकीची कल्पना निर्माण करणे), अज्ञानामुळे मन अनेक भ्रम निर्माण करते. भीती आसक्ती ,राग, लोभ, अभिमान इत्यादी भावना उत्पन्न होतात. हे अविद्याचे सक्रिय रूप होय. हे रूप मनाचा व्यत्यय घडवते.

४ त्रिगुणात्मक रुपे

सत्वगुणी अविद्या- ज्ञानासारखी पण अहंकार युक्त.

रजोगुणी अविद्या-- कर्म प्रधान

तमोगुणी अविद्या -- अंधकार, आळस.क्रोध,द्वेश,हिंसा.

५ विवेक चुडामणी या आद्य शंकराचार्यांच्या ग्रंथानुसार, अविद्या जीवावर पाच आवरणे घालते.

१ ''अज्ञान'' आत्म्याचे खरे स्वरूप न समजणे.

२ अस्मिता मी देह आहे हा अभिमान.

३ राग इंद्रिय सुखाची आसक्ती.

४ द्वेष अप्रिय वस्तूंची द्वेष भावना.

५ अभिनवेश मृत्यूची भीती आणि जीवनाची अति आसक्ती

यांनाच पतंजली ऋषींनी पांच क्लेश म्हणून सांगितले आहेत.

आता विद्या व अविद्या यातील काय फरक आहे तेही पाहू.

''विद्या'' आत्मा, परमात्मा, मोक्ष या विषयांचे ज्ञान देते. हे ज्ञान शाश्वत कायम टिकणारे असते.

''अविद्या'' देह, पदार्थ, इंद्रिय या विषयांचे ज्ञान देते. हे नाशवान किंवा तात्पुरते असते.

''विद्या'' मनुष्याला बंधनातून मुक्त करते. अंतर्मुख बनवते व आत्म्याचा उद्धार करते.

याउलट ''अविद्या'' मनुष्याला बंधनात टाकते. बहिर्मुख बनवते. देहाचे पालन करते.

मंडुकोपनिषद यातील श्लोक द्वे विद्ये वेदितव्ये- परा चापराच् /

परा विद्या (विद्या) :- ज्या ज्ञानाने अक्षर ब्रह्म समजले जाते. अपरा विद्या :- ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्ववेद व्याकरण छंद निरुप्त ज्योतिष आणि कल्प म्हणजे लौकिक ग्रंथाधारीत ज्ञान.

श्वेताशोत्तर उपनिषद

मायां तू प्रकृतीं विद्यान्मायीन तु महेश्वरम् //

येथे अविद्या म्हणजेच माया म्हणजेच प्रकृती जी जग निर्माण करते तर विद्याही ईश्वराचे ज्ञान जे मायेच्या पलीकडेल आहे हे देते. माया हीच प्रकृती आहे असे जाणारे आणि त्या मायला उत्पन्न करणारा तिचा अधिष्ठाता परमेश्वर म्हणजेच महेश्वर आहे.

अविद्येचे परिणाम

वस्तूचे खरे स्वरूप समजत नाही. मी देह आहे. मी कर्ता आहे. मी भोगता आहे. अशी चुकीची समजूत होते. यामुळे कर्मबंधन, संसार आणि पुनर्जन्म निर्माण होतो.

अविद्येचा नाश

अविद्येचा नाश केवळ विद्येने म्हणजेच आत्मज्ञानाने होतो.

अविद्याया मृत्यूं तीर्त्वा विद्यया अमृतमश्रुते

ईशा वास्योपनिषध ११

जसा सूर्य उगवल्यावर अंधार नाहीसा होतो तसेच ज्ञान उगवल्यावर अविद्या नाहीशी होते.

वरील विवेचनातून अविद्या हे मायेचेच अपत्य आहे हे आपण पाहिले आता अविद्या व माया यातील फरकही आपण पाहू.

१ *अर्थ*:-

अविद्या अज्ञान- आत्म्याचे खरे स्वरूप न ओळखणे.

माया - ईश्वराची सर्जन शक्ती(उत्पादन शक्ती) जी संपूर्ण जग निर्माण करते.

(क्रमशः)



## आरोग्य संजीवनी

# बाजरीचं सूप

ज्योतिर्मय साहित्य

थंडीच्या काळात शरीर केवळ बाहेरुन गरम करुन चालत नाही, तर शरीराला आतूनही उब मिळणं आवश्यक असतं. यासाठी बाजरीचं सूप हा उत्तम पर्याय आहे. बाजरीच्या सुपातील फायबरमुळे लवकर भूक लागत नाही. बाजरीचं सूप पिऊन शरीरात ऊर्जा निर्माण होते. लोह ,फॉस्फरस हे महत्त्वाचे घटक बाजरीच्या सूप मधून मिळतात. यामुळे शरीरातील रक्त वाढतं.

थंडी पडायला लागली की कपाटातले स्वेटर बाहेर निघतात. शेकोटीवर शेकणं सुरु होतं. शरीर गरम ठेवण्यासाठी ऊबदार पर्याय शोधायची खटपट आपली सुरु असते. पण थंडीच्या काळात शरीर केवळ बाहेरुन गरम करुन चालत नाही, तर शरीराला आतूनही उब मिळणं आवश्यक असतं. म्हणूनच थंडीत उबदार, गरम प्रकृतीचे पदार्थ खाण्यावर भर दिला जातो. थंडीत बाजरीचं सूप प्यावं, कारण बाजरीचं सूप पचनास मदत करतं, शिवाय यात न विरघळू शकणारे फायबर असतात. हे फायबर पोटात जाऊन प्रोबायोटिक सारखे काम करतात. तसेच बाजरीच्या सुपातील या फायबरमुळे लवकर भूक लागत नाही.

बाजरीच्या सुपातील न विरघळू शकणारे फायबर आणि हळूहळू पचणारे स्टार्च यामुळे हे सूप पिल्यानं रक्तातील साखर लगेच वाढत नाही. त्यामुळे वजन कमी करण्या सोबतच मधुमेहाच्या आजारातही हे सूप उपयुक्त ठरतं. बाजरीत गुंतागुंतीचं कार्बोदके असतात, त्यामुळे ते हळूहळू पचतात. यामुळे बाजरीचं सूप पितो तेव्हा पोट भरल्याची जाणीव लवकर होते आणि पोटही दीर्घकाळ भरलेलं राहातं. हे सूप पिऊन शरीरात ऊर्जा निर्माण होते. बाजरीच्या सूप मधून शरीरास आवश्यक असा ओमेगा-३ हे फॅटी ॲसिड मिळतं. हृदय निरोगी आणि सुरक्षित राहाण्यासाठी हा घटक खूप महत्त्वाचा असतो. लोह, फॉस्फरस हे महत्त्वाचे घटक बाजरीच्या सूप मधून मिळतात. यामुळे शरीरातील रक्त वाढतं. शरीरात ऑक्सिजनची कमतरता निर्माण होऊन कार्बन डायऑक्साइड वाढून पेशींचं होणारं नुकसान टाळलं जातं. थंडीत नियमित वाटीभर बाजरीचं सूप घेतल्यास स्मरणशक्ती आणि ऊर्जा वाढते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

बाजरीचं सूप जितकं पौष्टिक आणि चवदार आहे तितकंच ते बनवायला खूप सोपं आणि झटपट होणारं आहे. बाजरीचं सूप करण्यासाठी २ चमचे बाजरीचं पीठ, अर्धा कप दही, १ कांदा बारीक चिरलेला, १ चमचा आल्याची पेस्ट, ४ लसूण पाकळ्यांची पेस्ट, कढीपत्ता, १ बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिमूटभर मिरेपूड, १ चिमूटभर हिंग, चवीनुसार मीठ, थोडी हळद, १चमचा जिरे, एक ते दिड चमचा तूप किंवा बटर आणि २ वाट्या पाणी एवढं जिन्नस घ्यावं.

सर्वात आधी कढईत थोडं तूप किंवा बटर (शक्यतो साजूक तूपच घ्यावं) घालून बाजरीचं पीठ खमंग भाजून घ्यावं. मग ते एका भांड्यात काढावं. एका भांड्यात दही घेऊन त्यात पाणी घालून ते फेटून घ्यावं. बाजरीचं पीठ गार झाल्यावर दह्यात मिसळून घ्यावं. गुठळी राहू नये इतपत ते नीट मिसळावं. कढईत पुन्हा थोडं तूप घालून जिरे, कढीपत्ता, हळद, हिंग घालावं. ते चांगलं परतून घ्यावं. मिरचीचे तुकडे घालावेत. नंतर कांदा परतून घ्यावा. कांदा परतला गेला की आल्याची, लसणाची पेस्ट घालून ती परतून घ्यावी. नंतर दही बाजरीच मिश्रण त्यात घालावं. मंद आचेवर त्याला चांगल्या दोन तीन उकळ्या फुटू द्याव्यात. चवीनुसार मीठ घालून सूप चांगलं हलवावं. पुन्हा दोन तीन उकळ्या काढून गॅस बंद करावा. हे सूप गरम गरम प्यावं.



# लघु बोधकथा

### ♦अरण्य व लाकूडतोड्या♦

*एकदा एक लाकूडतोड्या रानात गेला असता इकडे तिकडे पाहात रडू लागला. तेव्हा रानातल्या झाडांनी त्याला विचारले, 'तू का रडतोस ? तुला काय हवं आहे ?' तो म्हणाला, 'माझ्या कुऱ्हाडीला दांडा नाही, त्यासाठी लाकडाचा एक लहानसा तुकडा मला द्याल तर बरं होईल.' ते ऐकून झाडांना त्याची दया आली व त्याला चिंचेच्या चिवट लाकडाचा एक तुकडा दिला. लाकूडतोड्याने तो आपल्या कुऱ्हाडीला घातला व सगळी झाडे तोडण्याचा सपाटा लावला. तेव्हा एक झाड इतर झाडांना म्हणाले, 'मित्रहो, आपण आपल्याच हाताने आपला नाश करून घेतला आहे. तेथे दुसऱ्याला नावं ठेवायला जागा नाही.'*


*तात्पर्य :*

*शत्रूची कीव करून त्याला साहित्य पुरविले तर शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ येते. शत्रूवरही उपकार करण्यात, त्याच्या चुकांबद्दल क्षमा करण्यात मोठेपणा आहे हे जरी खरे असले तरी ज्यामुळे आपला शत्रू बलवान होऊन आपल्यालाच उपद्रव देऊ शकेल. अशा प्रकारचे साह्य त्याला देणे हा मूर्खपणा होय.*

# पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे जयंती आहे. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर



पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

१८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

***

# वर्ल्ड पार्लमेंटकडून पर्यावरण प्रेमींचा सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रीरामपूर : वर्ल्ड पार्लमेंटच्या वतीने श्रीरामपूर पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरणप्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच इतरही क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या व्यक्तींना मा. श्री. शिवाजी राजेजाधव यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर सरदार संताजीराजे राजेघोरपडे यांचे वंशज मा. श्री. संजयकुमार राजेघोरपडे उपस्थित होते.

वर्ल्ड पार्लमेंट हि जागतिक संस्था आपल्या लौकीकाप्रमाणे जागतिक पातळीवर सातत्याने सामाजिक, पर्यावरण व कायदे क्षेत्रात कार्यरत आहेच परंतु शब्दशः आपल्या तत्त्व प्रणाली प्रमाणेच काम करते हे सिध्द झाले, असे प्रतिपादन

मा. श्री. शिवाजी दत्तात्रय राजेजाधव, शिंदखेडराजा, राजेलखुजीराव जाधवराव, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊ माँसाहेब यांचे माहेरचे वंशज यांनी व्यक्त केले. ते श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या वर्ल्ड पार्लमेंट सन्मान सोहळ्यात विशेष अतिथी म्हणून बोलत होते.

पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरण प्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ देऊन गौरविण्यात आले त्यात श्री. काळूराम पांडुरंग लांडगे -पर्यावरण




क्षेत्र (पुणे). डॉ. दिनकर श्रीधर पतंगे - पर्यावरण क्षेत्र (जत, सांगली). वजीर जमादार शेख -पर्यावरण क्षेत्र (पाडळी, पाथर्डी).

वर्ल्ड पार्लमेंटच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पर्यावरणप्रेमींना वर्ल्ड पार्लमेंट एमिझरी अवॉर्ड २०२५ पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच इतरही क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या व्यक्तींना मा. श्री. शिवाजी राजेजाधव यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. सदर कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींना वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड देऊन सन्मानीत करण्यात आले त्यामध्ये कॅप्टन नरेंद्र कुमार सिद्धू (निवृत्त) क्रीडा व साहित्य (मेरठ). श्री. उल्हास बाबाराव देशमुख -क्रीडा, शिक्षण, पर्यावरण, सामाजिक कार्य, कला व अभिनय (अकोला). डॉ. संतोष दामोदर पेठे - शिक्षण, साहित्य, पर्यावरण व सामाजिक कार्य (अकोला). डॉ. संजय रघुनाथ भराटे - आदर्श प्राध्यापक, शिक्षण व साहित्य (पाथर्डी). डॉ. सुभाष भगवानराव देशमुख -शिक्षण, साहित्य व सामाजिक कार्य (पाथर्डी). डॉ. सुभाष जगन्नाथ देशमुख - अर्थशास्त्र व शिक्षण (पाथर्डी).डॉ. रोहन प्रदीप पाटील - सामाजिक सेवा (करमाळा).श्री. नितेश विश्वनाथ देवघरकर- चित्रकला व पेंटिंग (पोलादपूर, रायगड ). कु. आशा भानुदास पालवे - सामाजिक कार्य, (अहिल्यानगर). प्रा. डॉ. सुधीर नरसिंगदास अग्रवाल -शिक्षण, साहित्य, पत्रकारिता व सामाजिक कार्य- (वर्धा). मिलिंद भारतराव लांडे -शिक्षण, क्रीडा व सामाजिक कार्य (अकोला). संजयकुमार रंगनाथ राजेघोरपडे - शिक्षण, आरोग्य व सामाजिक कार्य (करमाळा, सोलापूर). डॉ. शंकर रामदास अंदानी (सी.ए) -अर्थशास्त्र, शिक्षण, सोशल वर्क (अहिल्यानगर). श्री. राजेंद्र शंकरराव घोडके- सामाजिक कार्य (अहिल्यानगर).सौ. संजीवनी काळे- शिक्षण, साहित्य व समाजकार्य (अमरावती). बहिरू गभाले- शिक्षण, पर्यावरण व सामाजिक कार्य (करमाळा). यांचा समावेश आहे.

त्यांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून कार्य करणारे डब्ल्यूसीपीएचे महाराष्ट्र चॅप्टर अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून जेष्ठ कृषीतज्ञ डॉ. दिनकर श्रीधर पतंगे यांनी पर्यावरणाचे महत्व पटवून देताना वर्ल्ड पार्टमेंटच्या सर्वच उपक्रमांचे कौतुक केले. महाराष्ट्र शासनाच्या संपादकीय मंडळाचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे यांनीही वर्ल्ड पार्लमेंट विषयी असलेल्या चांगल्या अनुभवांना उजाळा दिला. सोलापूर जिल्हा शिक्षक संघटनेचे मा.श्री किसन बबन कांबळे यांनी भारतीय संविधानाविषयी उपस्थितांना विस्तृत ज्ञान दिले. जेष्ठ अर्थतज्ञ मा. श्री. शंकर अंदानी, सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.दत्तात्रय डोंगरे, डॉ. सुभाष देशमुख, विठ्ठलराव सोनवणे, अमोल जाधव, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

वर्ल्ड कॉन्स्टीट्यूशन अँड पार्लमेंट असोशिएशन अर्थात जागतिक संविधान व संसद संघाच्या महाराष्ट्र चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांच्या संकल्पनेनुसार प्रथा बनल्याप्रमाणे कार्यक्रमाचे उदघाटन उपस्थितांच्या हस्ते भारतीय संस्कृतीत व आयुर्वेदात अनन्यसाधारण महत्व असलेल्या तुळशीला जलार्पण करून झाले. तसेच पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे अनावरण व वाटप करण्यात आले. त्याचबरोबर श्री साई विठ्ठल अनाथाश्रम गोखलेवाडीतील मुलांना उष्ण कपडे व आर्थिक मदत करण्यात आली. वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना नेहमी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देत असल्याबद्दल सर्वच उपस्थितांनी डॉ. दत्ता विघावे यांचे कौतुक केले.

डब्ल्यूसीपीएचे अध्यक्ष डॉ. दत्ता विघावे यांनी प्रास्ताविक संस्थेच्या कार्याचा परिचय व भविष्यातील योजनांची माहिती दिली. तर राजेंद्र घोडके यांनी आभार मानले. संस्थेचे वरिष्ठ सदस्य बाळासाहेब कोठुळे यांनी सर्वांगसुंदर सुत्रसंचलन केले तर प्रसिध्दी प्रमुख वजीरभाई शेख व कोषाध्यक्ष चिंतामन भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अँड पार्लमेंट असोसिएशन ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जी पृथ्वीसाठी संविधान या संकल्पनेवर आधारित लोकशाही सरकारची स्थापना करण्यासाठी कार्यरत आहे ज्याचा उद्देश जागतिक शांतता आणि न्याय प्रस्थापित करणे आहे या संस्थेच्या अंतर्गत प्रोव्हिजनल वर्ल्ड पार्लमेंट नावाचे एक अस्थायी जागतिक संसद मंडळ आहे जे या संविधानाच्या तत्त्वांवर आधारित कायदे तयार करते आणि जागतिक प्रशासनाची पायाभूत सुविधा विकसित करण्याचे काम करते वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अँड पार्लमेंटची स्थापना १९५८ मध्ये प्रोफेसर फिलिप इस्ली आणि मार्गारिटली यांनी केली.

# घन घन माला नभी दाटल्या.....

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी शब्दांमध्ये एक वेगळीच जादू असते. अतिशय सुंदर, हळुवार, आल्हाददायी असणारे शब्द मनाला नेहमीच भुरळ घालतात. अतिशय उत्तमोत्तम मराठी गाणी अगदी जुन्या काळापासून प्रसिद्ध आहेत. आजही ती मोठ्या आवडीने गायली व ऐकली जातात.

वरदक्षिणा या जुन्या मराठी चित्रपटातील एक खूप गोड गाणे आजही आवर्जून ऐकावे असे वाटते. मन्ना डे आणि वसंत पवार यांनी हे गायले आहे. मन्ना डे हे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलाकाराने हिंदी भाषिक असून ही हे मराठी गाणं, त्यांनी अगदी सराईतपणे गायले आहे. आणि संगीत बद्ध केलय वसंत पवार यांनी.

घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा...

पावसाची गाणी म्हणताना हे गाणे अग्रस्थानी असते.

ढग दाटून आले असे सांगताना कवीने घन घन माला असा उल्लेख केला आहे. हे मनास हवे हवेसे वाटणारे शब्द मन उल्हासित



करून जातात.

पावसाचं वर्णन अतिशय सुंदर रीतीने कवीने केले आहे. हो हो, हे कवी आपले सर्वांचे आवडते ग.दि. माडगूळकर हेच आहेत.

केकारव करी मोर कनानी
उभवून उंच पिसारा
कालींदीच्या तटी श्रीहरी
तशात घुमवी धुंद बासरी
एक अनामिक
सुगंध येतो
ओल्या
अंधारा...

पावसाळी मंद धुंद वातावरणत मोराचं साद घालण किती मंजुळ भासते. मोराचे केकारव करणे पावसात ऐकू येतेच. अश्या या मोहक वातावरणात श्रीहरीची बासरी म्हणजे दुग्ध शर्करा योग नाही का ? आणि सोबत ओल्या मातीचा सुगंध अहाहा!अतीव सुंदर.



सौ.रचना गिरीश वसेकर
पुणे, सेल ९४२२१७५७४९

वरदक्षिणा हा चित्रपट १९६२ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटात रमेश देव, सीमा देव, शरद तळवलकर, राजा गोसावी, माई भिडे, दामू अण्णा मालवणकर, अरुण सरनाईक अशी प्रतिभा संपन्न मंडळी होती. दिनकर पाटील यांनी हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.


या चित्रपटाची जडण घडण करण्यात सगळ्याच प्रतिभावंत कलाकार, लेखक, कवी दिग्दर्शक यांचा मोलाचं वाटा आहे. हे गाणं चित्रित केलं आहे, राजा पटवर्धन यांच्यासह अनेक सह कलाकार यांच्यावर.


या गाण्यातील अतिशय सुंदर शब्दांची फुलपाखरे धुंद, पावसाळी वातावरणात ओठावर आपोआपच घुमू लागतात,





♦ म्युच्युअल फंड ♦

■ कर कार्यक्षमता:
एफडी वर, नियमित उत्पन्न म्हणून दरवर्षी व्याजावर कर आकारला जातो, परंतु म्युच्युअल फंडांमध्ये सामान्यतः जेव्हा तुम्ही रिडीम करता( पैसे काढता)तेव्हाच तुम्हाला कर आकारला जातो आणि होल्डिंग कालावधी आणि फंड प्रकारानुसार भांडवली-नफा कर (कॅपिटल गेन टॅक्स)अधिक अनुकूल असू शकतो.
■ विविधता आणि लवचिकता :
म्युच्युअल फंड अनेक सिक्युरिटीजमध्ये पैसे इनव्हेस्ट करतात, ज्यामुळे जोखीम कमी होते .बहुतेक ओपन-एंडेड योजना अकाली एफडी काढण्याच्या कठोर लॉक-इन आणि दंडाशिवाय सहज प्रवेश/निर्गमन देतात.
एफडी अशा गुंतवणूकदारांना अनुकूल असतात जे शेअर बाजाराची अस्थिरता सहन करू शकत नाहीत आणि मुद्दलाच्या किमान जोखमीसह खात्रीशीर, अंदाजे परतावा इच्छितात. अर्थातच खूप कमी कालावधीसाठी किंवा आणीबाणी निधी, तसेच जवळच्या कालावधीचे खर्च भागविण्यासाठी एफडीची स्थिरता बाजाराशी जोडलेल्या म्युच्युअल फंडांपेक्षा अधिक योग्य असू शकते. थोडक्यात दीर्घकालीन उद्दिष्टे (५+ वर्षे) आणि वाढीसाठी, म्युच्युअल फंड (विशेषतः इक्विटी आणि हायब्रिड फंड) सामान्यतः एफडीपेक्षा अधिक प्रभावी असतात.
तुम्ही जर तुमचे एफडी पुन्हा पाच वर्षासाठी रीन्यु करणार असाल तर म्युच्युअल फंडाच्या इक्वीटी अथवा बॅलन्स योजनेचा विचार अवश्य करायला हवा.



# चिंबोऱ्यांच्या नजरेतून समाजाचा आरसा एक क्लासिक

**ज्योतिर्मय साहित्य**

साहित्य हे केवळ कल्पनांचे अवकाश नसते, तर ते वास्तवाच्या मुळाशी जाऊन समाजातील असमतोल, संघर्ष आणि चेतनांना शब्दरूप देतं. जेव्हा एखादा लेखक निसर्गातील अत्यंत लहान जीवांच्या माध्यमातून मानवी सभ्यतेतील अंतर्विरोध उघड करतो, तेव्हा साहित्य केवळ गोष्ट राहात नाही – ते विचार, व्यंग्य आणि प्रतिकाराचं व्यासपीठ बनतं. डॉ. बाळासाहेब लबडे यांची 'चिंबोरे युद्ध' ही अशीच एक अद्भुत साहित्यकृती आहे, जी समुद्री जीव – चिंबोरे (केकडे) – यांच्या नजरेतून माणसांनी घडवलेल्या जगाचं व्यंग्यात्मक, विदारक आणि सखोल चित्र उभं करते.

'चिंबोरे युद्ध' या कादंबरीची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे ती समाजावर थेट टीका करत नाही, की उपदेशही देत नाही – लेखकाने प्रतीकात्मक शैलीचा निवड केली आहे, जिथे चिंबोर्यांसारखे समुद्रात राहणारे छोटे जीव बोलतात, विचार करतात, भांडतात, प्रेम करतात आणि सर्वात महत्त्वाचं माणसाच्या सत्तेची हाव, तंत्रज्ञानाचं वेड आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष यावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.


या कादंबरीचा नायक चिंबोरीमॅन केवळ एक खेकडा नाही, तो एक जिवंत तत्त्वज्ञ, भाष्यकार आणि प्रतिकारक आहे. जेव्हा तो म्हणतो : ''माझं काय विचारता? मी जमिनीतही राहतो आणि पाण्यातही...''

तेव्हा तो स्वतःला अशा अस्तित्वाच्या रूपात सादर करतो, ज्याच्यात सर्व प्रकारच्या संघर्षांमधूनही जगण्याची ताकद आहे आणि हीच ताकद आजचा सामान्य माणूस हळूहळू गमावत चालला आहे.

ही कादंबरी घटनांपेक्षा दृश्यांचा आणि प्रतीकांचे सजीव कोलाज आहे. लेखकाने खाडी, पाऊस, मच्छीमार, गजरा, छत्री, तुटलेला बाकडा, संविधानाची ओलसर पाने आणि आत्महत्येच्या चिठ्ठ्या अशा बिंबांमधून एक असं समाजचित्र उभं केलं आहे, जिथे वास्तव कल्पनेपेक्षाही अधिक भयावह वाटतं. जेव्हा चिंबोरे म्हणतात : ''आम्ही अजून माणसांवर ताबा मिळवलेला नाही, पण माणसांनी मात्र आमचे गुण जरूर आत्मसात केले आहेत...''

तेव्हा हे केवळ व्यंग्य नसून माणसाच्या ढासळणाऱ्या संवेदनशीलतेवरचा एक धारदार आघात आहे.

डॉ. लबडे यांच्या लेखणीची धार अधिक तीव्र होते जेव्हा ते चिंबोऱ्यांच्या माध्यमातून सत्तेचा आणि विचारधारांचा तमाशा उभा करतात. चिंबोरीमॅन स्वतः म्हणतो : ''मी जेव्हा सरळ चालत होतो, तेव्हा प्रतिक्रियावादी होतो. जेव्हा प्रगतिशील झालो तेव्हा उलट पायाने




चालू लागलो.''

ही ओळ आजच्या राजकीय आणि बौद्धिक वादविवादांतील दुटप्पीपणा आणि वैचारिक गोंधळावर मारक टीका करते.

'चिंबोरे युद्ध' मधील आणखी एक महत्त्वपूर्ण बाजू म्हणजे पर्यावरणाविषयीची जाणीव आणि त्यातील असमतोलाबद्दलची लेखकाची सखोल दृष्टी. जेव्हा पावसात चिंबोरे आपल्या कवच्यातून बाहेर पडतात, जेव्हा खाडीमध्ये वाहून संविधान, आत्महत्येच्या चिठ्ठ्या आणि गजरा येतो तेव्हा हे निसर्गदृश्य न राहता सामाजिक साक्ष होते. हे असं साहित्य आहे जे वाचकाला केवळ पाने पलटण्यास सांगत नाही, तर समाजाच्या थरांना उघडण्याची मागणी करतं.

✱या कादंबरीच्या शैलीमध्ये लोकभाषेचा गोडवा, हास्याचं संगीत आणि व्यंग्याची धार आहे. संवाद इतके सजीव आहेत की ते रंगमंचावर सादर केल्यासारखे वाटतात. चिंबोऱ्यांच्या सभा, त्यांची बोली, त्यांच्या गप्पाटप्पा हे सर्व वाचकाला हसवतातही आणि अंतर्मनात खोलवर जखमा करतात.

या सगळ्याच्या दरम्यान लेखक स्त्रीवादालाही विसरत नाहीत. समुद्रात तरंगणारी आत्महत्येची चिठ्ठी त्या युवतीची आहे, जिला म्हणावंसं वाटतं:

''तुम्ही माझं आयुष्य कैद केलंत... कारण मला माझ्या मर्जीनं जगायचं होतं...''

ही एक मुलगीचं बोलणं नाही, तर त्या सर्व आवाजांचं प्रतीक आहे, जे या व्यवस्थेत स्वतःची स्वायत्तता शोधताना संपून जातात.

'चिंबोरे युद्ध' हा एक असाच आरसा आहे, ज्यात पाहणाऱ्याला स्वतःची विकृत प्रतिमा दिसते आणि हीच या कादंबरीची सर्वात मोठी ताकद आहे. ही केवळ दलित अनुभवांची व्याख्या नसून, ती संपूर्ण माणुसकीतील असंतुलनाची शोकांतिका आहे.

✱या दृष्टिकोनातून पाहिलं तर म्हणता येईल की 'चिंबोरे युद्ध' ही समकालीन साहित्यकृती भविष्यात ''क्लासिक'' मानली जाईल कारण तिचा विषय, शिल्प आणि चेतना ही काळाच्या सीमा ओलांडणारी आहेत.

या बहुपर्यायी, बहुभाषिक आणि बहुस्तरात्मक कादंबरीचं हिंदीमध्ये अनुवादित रूप गोरख थोरात यांनी फारच संवेदनशीलतेने आणि काळजीपूर्वक साकारलं आहे. त्यांनी केवळ शब्द नव्हे तर भावना, लहेजा, विनोद आणि प्रतीक यांचेही सुंदर अनुवाद केले आहेत.

✱विनोद आणि व्यंग्य या शैली अनेकदा अनुवादात फिकट पडतात, पण गोरख थोरात यांनी चिंबोरीमॅन आणि त्याच्या साथींच्या आवाजाला तितक्याच जिवंतपणे हिंदीत उतरवलं आहे, जसं ते मूळ मराठीत होते. त्यांनी वाचकाला ही भावना दिली की तो अनुवादित ग्रंथ वाचत नाहीये, तर हिंदीतच लिहिलेली एक मूळ साहित्यकृती अनुभवत आहे

'चिंबोरे युद्ध' ही केवळ एक कल्पनारम्य गोष्ट नाही, तर आपल्या काळाच्या शोकांतिकेचा दस्तऐवज आहे जो खेकड्यांच्या कवच्यामध्ये लपलेल्या मानवतेचा कडवट, खराखुरा आणि अत्यंत आवश्यक आवाज आहे. त्यातील तीव्र व्यंग्य, गहन संवेदना आणि प्रतीकात्मकता यामुळे ही कादंबरी निश्चितच आधुनिक भारतीय साहित्यात क्लासिक बनण्याची पात्रता बाळगते.

✱जर आपण जागतिक प्रतीकात्मक साहित्यकृतींची चर्चा केली तर 'चिंबोरे युद्ध' ही स्तनदायिनी (महाश्वेता देवी), साप आणि दोरी (राजा राव) यांसारख्या रचनांच्या पंक्तीत उभी राहते ज्या प्रतीकांच्या माध्यमातून सत्ता, समाज आणि माणसाच्या गुंतागुंतीला उकलण्याचा प्रयत्न करतात.

आज, जेव्हा साहित्य 'बाजार' आणि 'अल्गोरिदम' च्या मर्यादेत अडकत चाललं आहे, तेव्हा 'चिंबोरे युद्ध' वाचकाला केवळ सहवाचक नाही तर सहचिंतक, सहसंघर्षी बनवते. ही रचना एखाद्या 'बंद पुस्तकासारखी' नाही, तर एका उघड संवादासारखी आहे जिथे लेखक, वाचक आणि पात्र एकत्र येऊन सृजन करतात.


'चिंबोरे युद्ध' याला एक आधुनिक 'क्लासिक' म्हणणं योग्य ठरेल. ही कादंबरी लोकजीवनापासून जागतिक जाणिवांपर्यंत, विनोदापासून शोकांतिकेपर्यंत, खाडीतून संसदेपर्यंत सगळं सामावून घेते. ही खेकड्यांच्या वळणावळणाच्या चालीतून जन्मलेली एक नवी विचारसरणी आहे. ही त्या आवाजांची गोष्ट आहे, जी आपण कधी ऐकतच नाही आणि जी ऐकणं आज अत्यंत आवश्यक आहे.

''जर तुम्ही कधी आयुष्याला किनाऱ्यावरून पाहिलं असेल, जर तुमच्या आत कुठेतरी लाटा उसळल्या असतील आणि जाळं उतरल्याचं जाणवलं असेल तर 'चिंबोरे युद्ध' केवळ एक पुस्तक नाही, एक आरसाच आहे.''

✍
**डॉ. संघमित्रा राएगुरु**
**(द्विभाषिक कवयित्री व अनुवादिका)**
**रांची, झारखंड (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)**

# सावित्री ज्योती

**ज्योतिर्मय साहित्य**



जोडीदार निवडताना ३६ गुण जुळण्या ऐवजी एकमेकांचे विचार जुळले तर समाजात काय क्रांती घडू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्योतिबा आणि सावित्री यांच्या सह जीवनाचा प्रवास. असं एक नातं, अशी एक भागीदारी, ज्याने फक्त दोन आयुष्य नाही तर अख्या भारतीय समाजाला एक दिशा मिळाली. त्यांचे एकमेकांवर असलेले निरतिशय प्रेम, विश्वास, निष्ठा विविध प्रसंगातून दिसून आले आहे. इथे मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते १८७४ साली रूढी परंपरांनी जखडलेल्या सनातनी समाजात एक धाडसी निर्णय ज्योतिबांनी घेतला, ज्योतिबा सावित्री यांना स्वतःचे अपत्य नव्हते. त्यावेळी त्यांनी दुसरे लग्न करण्याऐवजी एका विधवेच्या मुलाला दत्तक घेण्याचे ठरवले. यातूनच ज्योतिबांचे सावित्री वरील प्रेम लक्षात येते त्याचबरोबर समाजात बदल घडवण्यासाठी एका विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजासमोर एक आदर्श घालून दिला.

सावित्री आणि ज्योतिबा यांनी एकत्रितरित्या स्त्री शिक्षणासाठी आणि बहुजन, अस्पृश्य समाजाच्या हक्कासाठी काम करायचे ठरवले आणि त्या ध्येयासाठी ते आयुष्यभर झटले. जोतिबांचे प्राथमिक शिक्षण झाले, त्यांनी स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला आणि खऱ्या अर्थाने तिथे त्यांना सामाजिक विषमतेची जाणीव झाली. समाजातील ही विषमता त्यांना अस्वस्थ करू लागली. ही विषमता कशी मिटवता येईल हा एकच ध्यास आता चालू झाला. त्याच दरम्यान त्यांचा विवाह नायगाव येथील सावित्री खंडोजी नेवसे या कन्येशी झाला आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने एका नव्या पर्वाची सुरुवात झाली, तो पर्व होता स्त्री शिक्षणाचा. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, गुलामी या सगळ्यात कितपत पडलेला समाजाला बाहेर काढायचे झाले तर शिक्षण खूप महत्त्वाचे आहे हे ज्योतिबांनी ओळखले होते. स्त्री शिक्षण हेच त्यांच्या जगण्याचे ध्येय झाले. बहुजन समाजाच्या हक्क, स्त्री शिक्षण यासाठी त्यांनी स्वतःला समर्पित केले.

या कामात खऱ्या अर्थाने साथ मिळाली ती सावित्रीची. अर्धांगिनी या शब्दाला खरे करत, पतीच्या स्वप्नांना ती आकार देऊ लागली. पतीच्या पंखांना बळ देऊ लागली. ज्योतिबांनी ही पती या नात्याने पत्नीच्या हुशारीला, जिद्दीला, प्रगल्भतेला नवी दिशा मिळवून दिली. हीच दिशा समाजाची दुर्दशा संपवण्यास हळूहळू कारणीभूत ठरू लागली. लग्नानंतर काही दिवसातच सावित्री अक्षरे गिरवू लागली. गुरु होते स्वतः ज्योतिबा. सावित्री संसार सांभाळत शिक्षण घेत होती. पतीच्या समाजकार्यात जमेल तसं जमेल तेव्हा मदत करत होती . थोड्या दिवसानंतर प्रत्यक्षरीत्या तिने कार्याला सुरुवात केली. १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात देशातील पहिल्या मुलींच्या शाळेची मुहूर्तमेढ झाली, आणि स्वतः सावित्रीबाई शिक्षिका म्हणून काम पाहू लागल्या. त्याचबरोबर त्यांनी समाजातील खालच्या जातीतील लोकांसाठी शाळा उघडल्या, विधवांचे बाळंतपण केले, त्यांचा पुनर्विवाह व्हावा यासाठी प्रोत्साहन दिले. हे करत असताना त्यांनी लेखनाचा छंद ही जोपासला.

दोघा उभयंतांनी समाजातील उणीवांवर विविध पुस्तकांच्या माध्यमातून भाष्य केले. शेवटच्या श्वासापर्यंत समाजकार्यासाठी झटणारे ध्येयवेढे दांपत्य म्हणजेच सावित्री ज्योती. अर्धांगवायूचा त्रास होत असताना ज्योतिबांनी सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक त्यांचे शेवटचे पुस्तक ठरले. जोतिबांच्या मृत्यू नंतरही पतीची इच्छा म्हणून सावित्रीबाई समाजकार्यात सतत कार्यरत राहिल्या. आणि याच कामात असताना पुण्यातील प्लेगच्या रोग्यांना मदत करताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. हा त्यांचा जीवन प्रवास वाचताना, अनुभवताना असे सावित्री ज्योती पुन्हा होणे नाही याची प्रचिती येते.

धन्य तो ज्योती धन्य ती सावित्री
शोषितांचे कैवारी स्त्री शिक्षणाचे उदगाते
ज्योती सावित्रीच्या या कामाची कदर करूया
पुरोगामी महाराष्ट्र खऱ्या अर्थाने घडवूया

✱✱✱



अर्चना हिंग्लजकर,
शिरवळ, 9225527464

# सावित्रीबाई फुले यांचे अलौकिक कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

सावित्रीबाई फुले यांची जयंती दरवर्षी तीन जानेवारी रोजी साजरी केली जाते. या दिवसाला बालिका दिन किंवा महिलामुक्ती दिन म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कारण त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या आणि त्यांनी महिलांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

सावित्रीबाई फुले या नावातच एक चैतन्य आहे, एक ऊर्जा आहे. एकोणिवासाव्या शतकाच्या मध्यावर ज्यावेळी भारतासारख्या रुढीवादी आणि परंपरावादी देशात स्त्रीला स्वातंत्र्य तर सोडाच पण समाजात कुठलाही दर्जा नव्हता, ''चूल आणि मूल'' यातच जणू तिची इतिकर्तव्यता होती, मनुस्मृतीने स्त्रियांवर अनेक बंधने घातली होती आणि त्या काळातील समाजव्यवस्थेनेही ती बंधने अगदी सहज स्वीकारली होती, अशा काळात तिला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा देण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले. हे फार मोठे कार्य त्यांनी केले. याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. आज स्त्रिया शिक्षण घेऊन जे स्वातंत्र्य आणि सन्मानाचे जीवन जगत आहेत, त्याचे संपूर्ण श्रेय सावित्रीबाई फुले यांना जाते. त्या भारताच्या आद्य शिक्षिका आहेत. शिक्षणाची ही प्रेरणा सावित्रीबाईंना कुठून मिळाली हे पाहण्यासाठी आपणास थोडे मागे जावे लागेल.

इ.स. १८४० साली वयाच्या नवव्या वर्षी सावित्रीबाईंचा विवाह जोतीराव फुले यांच्याशी झाला. त्यावेळी जोतीराव अवघे तेरा वर्षांचे होते. जोतीरावांना लहानपणापासून मातेचे प्रेम मिळाले नाही. त्यांची मावस बहिण सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याकडे कामाला असल्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचेही आणि बोलताही यायचे. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग करून जोतीरावांना शिक्षणासाठी प्रेरित केले. जोतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना एका ख्रिश्चन मिशनऱ्याने लग्नापूर्वी दिलेले पुस्तक त्या लग्नानंतर सासरी घेऊन आल्या. त्यावरून जोतीरावांना एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वत: शिकून सावित्रीबाईंनाही शिकविले. सगुणाऊही सोबत होतीच.

एक मे १८४७ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. पुढे ही शाळा मध्येच बंद पडली. एक जानेवारी १८४८ रोजी भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी मुलींची शाळा काढली. सगुणाऊंना त्या शाळेत बोलविण्यात आले. तत्कालीन ब्रिटीश भारतातील एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिली मुलींची शाळा ठरली. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्याच्या इतर भागातही त्यांनी मुलींसाठी दोन तीन शाळा काढल्या.

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला केवळ सहा मुली होत्या. पण १८४८ सालच्या अखेरपर्यंत ही संख्या ४०-४५ वर जाऊन पोचली. सावित्रीबाईंच्या या यशामुळे सनातनी उच्च वर्णीय चिडले. '' धर्म बुडाला, आता जग बुडणार'' अशी हाकाटी त्यांनी सुरू केली. इतकेच नव्हे तर सावित्रीबाई शाळेकडे जात असतांना त्यांच्या अंगावर शेण फेकण्यास सुरुवात केली. काहींनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण सावित्री बाई डगमगल्या नाहीत. त्यांना जोतीरावांची खंबीर साथ होती. अनेक संघर्ष करीत हा शिक्षणप्रसाराचा उपक्रम त्यांनी सुरूच ठेवला.



या दरम्यान एक गोष्ट सावित्रीबाईंच्या लक्षात आली. ती म्हणजे, शिक्षणप्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रात काम करणे आणि स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे हे त्यांनी ओळखले. बाला-जरठ विवाहामुळे अनेक मुली वयाच्या बाराव्या तेराव्या वर्षीच विधवा होत. ब्राह्मण समाजात त्याकाळी विधवेला पुनर्विवाह करण्यास अनुमती नव्हती. पतीनिधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा केशवपन करून त्यांना कुरूप बनविले जाई. कधी कधी अशा विधवा एखाद्या नराधमाच्या शिकार बनत असत आणि मग त्या आत्महत्या करीत किंवा भृणहत्या करीत.

या समस्येवरील उपाय म्हणून ज्योतीरावांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालविले.

या सर्व गोष्टींवरून आपल्याला सावित्रीबाई फुले यांच्या लौकिक कार्याची महती कळते.

त्यांच्या स्मृतीस त्रिवार वंदन.



उद्धव भयवाळ
छ. संभाजीनगर मो ८८८८९२५४८८




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559